# बातमीपत्र - फेब्रुवारी २०२६

**जपूया संस्कृती, विणूया नाती**

**६-९ ऑगस्ट २०२६, सिॲटल्**

बीएमएम२०२६ सिॲटल्- बातमीपत्राच्या सर्व वाचकांना नमस्कार. नुकत्याच साजऱ्या झालेल्या भारतीय प्रजासत्ताक दिनाच्या तसेच येणाऱ्या शिवजयंती आणि मराठी भाषा दिनाच्या सर्वांना मनःपूर्वक शुभेच्छा!! 🌸



सिॲटल महाराष्ट्र मंडळातर्फे (SMM) १७ जानेवारी रोजी मकर संक्रांत विशेष कार्यक्रमाचे अत्यंत उत्साहात आणि यशस्वीपणे आयोजन करण्यात आले. या आनंददायी व मंगल प्रसंगी बीएमएम२०२६ स्नेहसंमेलनाच्या नोंदणीचा शुभारंभ करण्यात आला. या महत्त्वाच्या क्षणी बीएमएमचे **अध्यक्ष मा. श्री. प्रसाद पानवळकर** हे उपस्थित होते. त्यांच्या उपस्थितीमुळे नोंदणी शुभारंभ कार्यक्रम अधिकच उत्साहवर्धक व प्रेरणादायी ठरला. मोठ्या संख्येने सभासदांनी कार्यक्रमाला उपस्थित राहून या ऐतिहासिक क्षणाचा साक्षीदार होण्याचा आनंद घेतला.

पेनसिल्व्हेनिया येथील सौ. नीलम काणे या संमेलनाचे **पहिले तिकीट** खरेदी करणाऱ्या सभासद ठरल्या. त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन व आभार 👏🏻🙏🏽

## 🎟️ BMM २०२६ तिकीट विक्री – चार टप्पे

बीएमएम२०२६ स्नेहसंमेलनासाठी तिकीट विक्रीचे एकूण चार टप्पे निश्चित करण्यात आले आहेत :

1. मकर संक्रांत ते गुढीपाडवा
2. गुढीपाडवा ते महाराष्ट्र दिन
3. महाराष्ट्र दिन ते ४ जुलै (अमेरिकेचा स्वातंत्र्यदिन)
4. ४ जुलै ते स्नेहसंमेलन शुभारंभ दिनांक (६ ऑगस्ट)

प्रत्येक पुढील टप्प्यात तिकीट दर वाढत जाणार आहेत. त्यामुळे इच्छुकांनी पहिल्या टप्प्यातील कमी दराचा लाभ घेत, शक्य तितक्या लवकर तिकीटे खरेदी करावीत. यामुळे तुम्हाला मुख्य प्रेक्षागृहात पुढील रांगेत बसण्याची संधी मिळू शकते. तसेच, मित्र-मैत्रिणींबरोबर एकत्र बसण्याची बैठकव्यवस्था हवी असल्यास, तुमच्या शहरातील मराठी मंडळाशी संपर्क साधावा. अन्यथा, स्नेहसंमेलनाच्या अधिकृत संकेतस्थळावरून थेट नोंदणी करता येईल: 👉 https://bmmseattle2026.org/bmm2026

**नवीन काय?**
🆕 तिकीट विक्री व नोंदणी प्रक्रियेत सिॲटल् संमेलन समितीने काही नवे व उपयुक्त पर्याय उपलब्ध करून दिले आहेत. ज्यांना सकाळचा नाश्ता किंवा रात्रीचे जेवण नको असेल, त्यांना ते पर्याय वगळूनही तिकीट खरेदी करता येणार आहे. कृपया आपल्या कुटुंबीयांना व मित्र-मैत्रिणींना तिकीट विक्रीबाबत माहिती देऊन, वेळेत नोंदणी करण्यासाठी प्रोत्साहित करा ही विनंती.

बीएमएम२०२६ स्नेहसंमेलनाची नोंदणी प्रक्रिया यशस्वीपणे पूर्ण करण्यासाठी आमच्या Registration Team आणि Web Team यांनी तसेच नोंदणी संदर्भात सर्व माहिती प्रभावीपणे लोकांपर्यंत पोहोचवण्यासाठी Marketing Team ने महत्त्वाची भूमिका बजावली. नोंदणी प्रक्रियेसाठी इतर आवश्यक माहिती संकलित करण्यात काही समित्यांनीही मोलाचे योगदान दिले. या सर्वांच्या समन्वयामुळे आणि सहकार्यामुळे हा प्रवास अधिक सुकर झाला.

---

## 🌟 कार्यक्रमांची घोषणा 🌟

🎤 **प्रमुख वक्त्या:** डॉ. माधुरी कानिटकर - पहिल्या मराठी सेवा-निवृत्त लेफ्टनंट जनरल.
भारतीय सेनेतील सर्वोच्च शिखरांपासून ते विद्यापीठाच्या नेतृत्वापर्यंतचा त्यांचा प्रवास अत्यंत प्रेरणादायी आहे. त्यांचे विचार, अनुभव आणि नेतृत्वकथा सर्वांसाठी मार्गदर्शक ठरणार आहेत.

🎭 **मराठी नाटक - “कुटुंब किर्रतन”** – किरकिर् करणाऱ्या नात्यांवर आधारित कौटुंबिक कॉमेडी
सादरकर्ते: संकर्षण कऱ्हाडे, अमोल कुलकर्णी, तन्वी मुंडले आणि वंदना गुप्ते
BMM स्नेहसंमेलनात भारतातून येणाऱ्या मराठी नाटकाचे चार वर्षांनंतर पुनरागमन होत आहे!

📜 **माय मराठीचा गौरव**
या विभागांतर्गत दोन विशेष कार्यक्रम :
• गोष्ट इथे संपत नाही – शिवआख्यान
मराठ्यांच्या गौरवशाली इतिहासातील शौर्य, धैर्य आणि चातुर्याचे प्रभावी कथाकथन.
• मधुरव – बोली ते ब्लॉग - प्रमुख कलाकार: माधुरा वेलणकर-सटम
या कार्यक्रमात दृक्-श्राव्य माध्यमातून मराठी भाषेचा इतिहास, साहित्य, सौंदर्य, सामर्थ्य आणि तिची उत्क्रांती अत्यंत रंजक व प्रभावी पद्धतीने उलगडून दाखवण्यात येणार आहे.

🎶 🎤 🎸 **‘संगीत रजनी’ अंतर्गत**

• विदुषी आरती अंकलीकर-टिकेकर आणि पंडीत रघुनंदन पणशीकर - शास्त्रीय संगीत व नाट्यसंगीताची सुरेल मैफल.
• अविनाश–विश्वजीत आणि निलेश मोहरीर - नव्या उमेदीच्या संगीतकारांचा धमाकेदार संगीत सोहळा.
• मस्तीची मधली सुट्टी -सादरकर्ते पारितोषिक विजेते, प्रख्यात संगीतकार व गायक डॉ. सलील कुलकर्णी खास मुलांसाठी
• कँडल लाईट कॉन्सर्ट विथ शुभंकर कुलकर्णी –भाषा बदलतात, पण सूर तोच राहतो. युवा पिढीसाठी खास, ऊर्जेने भरलेला कार्यक्रम!

🎨 **कला-स्पंदन कला दालन**

आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रसिद्ध व पुरस्कार विजेते चित्रकार सुचित्रा भोसले आणि प्रमोद कुर्लेकर प्रात्यक्षिके आणि ‘कलाकारांबरोबर संवाद – कॅनव्हासच्या पलीकडून’ या विशेष कार्यक्रमासाठी उपस्थित राहणार आहेत. अधिक माहितीसाठी :

👉 https://bmmseattle2026.org/kalaspandan-artgallery

🌎 **उत्तर अमेरिकेतील निश्चित झालेले कार्यक्रम**

1. संगीत वस्त्रहरण (राली) - लोकप्रिय धमाल विनोदी नाटक
2. मोगरा फुलला (लॉस एंजेलिस) - गो. नी. दांडेकरांच्या साहित्याचे दृक श्राव्य वाचन
3. हसू बाई जोरात (बे एरिया) - ११ महिलांची स्टॅन्ड-अप कॉमेडी
4. सत्यजित लिमये प्रस्तुत वाद्यसंगम ( सिॲटल) - २५ वादकांचा ताफा

---

🏆 **स्पर्धा विभाग**

• उत्तर अमेरिकेतील अनेक गुणी कलाकारांसाठी सुवर्णसंधी – बीएमएम२०२६ **स्वरमंच** गायन स्पर्धा
हा मंच आहे उदयोन्मुख आणि प्रस्थापित गायकांसाठी, समूहांसाठी आणि प्रत्येक वयोगटासाठी!!
मार्गदर्शक आणि परीक्षक: प्रख्यात संगीतकार व गायक डॉ. सलील कुलकर्णी
एकल व समूहगीत स्पर्धेसाठी नोंदणी व अर्ज सादर करण्याची अंतिम तारीख: १५ फेब्रुवारी २०२६
प्रश्नांसाठी: naprogramsmusic@bmmseattle2026.org

**इतर सुरू असलेल्या स्पर्धा :**

• स्मरणिका कथा व मुखपृष्ठ स्पर्धा
• नांदा हास्य भरे – स्टँडअप कॉमेडी
• नृत्य झंकार – शास्त्रीय व उपशास्त्रीय नृत्य

• नाच ग घुमा, नाच रे पोरा – लोकनृत्य
• चला मंगळागौर खेळूया
• रंग महाराष्ट्राचे – ज्युरीड कला दालन

ढोल-ताशा आणि एकांकिका स्पर्धेच्या प्रवेशिका स्वीकारण्याची अंतिम मुदत आता संपली आहे.
सर्व स्पर्धांची माहिती: 👉 https://bmmseattle2026.org/competitions

**👧 👦 बालकलाकारांसाठी विशेष कार्यक्रम**
गुरुवार – Day Zero साठी बालकलाकारांचे विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात आले असून, सर्व स्थानिक मराठी शाळांचा सहभाग असणार आहे. सहभागासाठी त्वरित अर्ज करा :
👉 https://bmmseattle2026.org/baltarang-kishorekunj

आपल्या योगदानातून हे स्नेहसंमेलन अधिक भव्य, समृद्ध आणि संस्मरणीय बनेल. मराठी संस्कृतीच्या या महोत्सवाला आपला हातभार जरूर लावा. संपर्क : donations@bmmseattle2026.org
🙏 Be a Donor – Support Us

शेवटी, आठवण करायची आहे की  बीएमएम२०२६ स्नेहसंमेलनाला आता केवळ ७ महिने उरले आहेत. तयारी पूर्ण वेगाने सुरू असून, विविध समित्यांचे स्वयंसेवक निष्ठेने व उत्साहाने कार्यरत आहेत. हे सर्व आपल्या सहकार्यामुळेच शक्य झाले आहे. आपल्या सततच्या पाठिंबा, विश्वास आणि सहभागाबद्दल आपणा सर्वांचे मनःपूर्वक आभार 🙏 संस्कृती, साहित्य आणि कलेचा आस्वाद घेण्यासाठी तसेच मैत्रीच्या गाठी बांधण्यासाठी ६ ते ९ ऑगस्टदरम्यान सिअॅटल् मध्ये प्रत्यक्ष भेटूया!

आपली साथ, आपला सहभाग हाच आमचा खरा उत्साह आहे. 🙏 🌸

अश्विनी क्षीरसागर,

(बीएमएम२०२६ समिती)